सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

**आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका**

# करोना विषाणू संसर्ग काळजी करून नका सावध रहा...
# लक्षणे दिसल्यास उपचार घ्या... प्रवास करताना... काळजी घ्या !



**प्रश्न १ नॉव्हेल करोना व्हायरस आजार कशामुळे होते ?**

उत्तर –Novel corona virus 2019-nCov या विषाणुमुळे होतो.

**प्रश्न २ नॉव्हेल करोना व्हायरस म्हणजे काय ?**

उत्तर – डिसेंबर २०१९ पासून चीनमधील हुबेई प्रांतातील बुहान शहरात न्युमोनियाचे अनेक रूग्ण आढळले असुन सदर न्युमोनियाचे कारण नव्या प्रकारचा करोना विषाणु nCov २०१९ असल्याचे सिध्द झाले आहे. या विषाणुचे नॉव्हेल करोना व्हायरस–nCorona 2019 असे नामकरण केलेले आहे.

**प्रश्न ३ नॉव्हेल करोना व्हायरसचा रोगप्रसार कसा होतो ?**

उत्तर –या विष्णुचा रोग प्रसार नक्की कशाप्रकारे होतो याची निश्चीत माहिती आजच्या घडीला उपब्लध नाही. मात्र लक्षणांचे स्वरूप पाहता शिंकणे, खोकणे, यावाटे हवेमार्फत (Droplet) या विषाणुचा प्रसार होतो असावा असा एक अंदाज आहे. या विष्णुकरिता कोणतीही लस अथवा विशिष्ट औषध उपलब्ध नाही. करोना विषाणु हा प्राणीजन्य आजार असला तरी हा नविन विषाणु नक्की कोणत्या प्राण्याच्या संपर्कातुन पसरतो या बद्दल सद्या निश्चीत माहिती नाही.

**प्रश्न ४ नॉव्हेल करोना व्हायरस आजाराची सामन्य लक्षणे कोणती ?**

उत्तर –ताप, सर्दी, खोकला(कॉमन कोल्ड), गंभीर स्वरूपाची श्वसन संस्थेची लक्षणे, श्वास घ्यायला त्रास होणे, श्वासास अडथळा, न्युमोनिया, अतिसार, मुत्रपिंड निकामी होणे.

**प्रश्न ४ नॉव्हेल करोना व्हायरस आजाराची सामन्य लक्षणे कोणती ?**

उत्तर –ताप, सर्दी, खोकला(कॉमन कोल्ड), गंभीर स्वरूपाची श्वसन संस्थेची लक्षणे, श्वास घ्यायला त्रास होणे, श्वासास अडथळा, न्युमोनिया, अतिसार, मुत्रपिंड निकामी होणे.

**प्रश्न ५ नॉव्हेल करोना व्हायरस आजारांवरील उपचार कोणते ?**

उत्तर –रूग्णांच्या लक्षणांनुसार उपचार करावा. रूग्णाला साह्यभुत ठरणारी निगा(Suppotive Care) अत्यंत प्रभावी ठरते.

**प्रश्न ६ नॉव्हेल करोना आजार होऊ नये म्हणुन घ्यावयाची खबरदारी कोणती?**

उत्तर – **नागरिकांनी घ्यावयाची खबरदारीचे उपाय -**

- सर्दी, खोकला असलेल्या व्यक्तीने लक्षणे नाहीशी होईपर्यंत घरीच थांबावे, जनसंपर्क टाळावा.
- शिंकताना किंवा खोकताना नाकातोंडावर रूमाल धरावा.
- डॉक्टरांनी दिलेल्या औषधाशिवाय गरम पाण्यात मीठ, हळद टाकुन गुळण्या करणे, गरम पाण्याची वाफ घेणे असे घरगुती उपायही करावेत.
- घरातील टेबल, टीपॉय, संगणकाचा की बोर्ड यासारखे पृष्ठभाग वांरवार स्वच्छ करावेत.
- वांरवार हात, साध्या साबणाने स्वच्छ व स्वच्छ पाण्याने धुवावेत.
- श्वसन संस्थेचा आजार असलेल्या व्यक्तींशी निकट सहवास टाळणे.
- न शिजवलेले अथवा अपुरे शिजवलेले मास खाऊ नये. फळे भाज्या न धुता खाऊ नये.

हे टाळा –

- ध्रुमपान करणे..
- सार्वजनिक ठिकाणी थुंकणे.
- खोकला सर्दी असताना गर्दीच्या ठिकाणी जाणे. उदा. सिनेमागृह, बाजार, एस.टी.स्टँड ई. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेणे.

**प्रश्न ७ नॉव्हेल करोना व्हायरस व मर्स किंवा सार्स यामधील साम्य काय आहे ?**

उत्तर –साध्यासुध्या सर्दी खोकल्या पासुन मर्स किंवा सार्स सारख्या गंभीर आजारास कारणीभूत असणाऱ्या एका विशिष्ट प्रकारच्या विषाणु गटास करोना विषाणू असे म्हणतात. स २००३ साली आढळलेला सार्स हा देखील एक प्रकारचा करोना विषाणुच होता सध्या चीन मधील उद्रेकात आढळलेला विषाणु हा करोना विषाणुच आहे. तथापि त्याची जनुकीय रचना पुर्णपणे नवीन असल्याने त्यास नॉव्हेल करोना विषाणु असे नाव देण्यात आलेले आहे.

प्रश्न ७ नॉव्हेल करोना व्हायरस बाबत प्रयोगशाळा तपासणी कोणाची व कोठे करावी ?

उत्तर –नॉव्हेल करोना आढळुन आलेल्या देशामधुन १४ दिवसांच्या आत आलेला प्रवाशी ज्यांना ताप सर्दी खोकला यासारखी लक्षणे असतील त्यांनी विलगीकरण कक्षात भरती करणे आवश्यक आहे. अशा रूग्णांचा घेण्यात यावा व नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ व्हायरालॉजी पुणे कस्तुरबा हॉस्पिटल मुंबई येथे तपासणीकामी पाठविण्यात यावा.

प्रश्न ९ नॉव्हेल करोना व्हायरस आजार कोणाला होऊ शकतो ?

उत्तर –

* सर्दी, ताप, खोकला तसेच श्वसनाचा त्रास होत असल्यास आणि रूग्णाने नुकताच करोना विषाणुबाधीत देशात प्रवास केला असल्यास.
* प्रतिकारशक्ती कमी असलेल्या आजारी व्यक्ती आणि ज्यांनी नुकताच करोना विषाणु बाधीत देशात प्रवास केला असल्यास.
* उपचार करणारे डॉक्टर्स व आरोग्य कर्मचारी.

प्रश्न १० नॉव्हेल करोना व्हायरस आजाराचा संशयीत रूगण कोणास म्हणावे ?

उत्तर – एखादी व्यक्ती नॉव्हेल करोना बाधीत देशाला भेट देऊन आलेला असुन त्यात १४ दिवसांच्या आत सर्दी, ताप, खोकला, आढळुन आलेला असल्यास त्याला संशयीत नॉव्हेल करोना व्हायरस आजाराचा रूग्ण म्हणतात.

प्रश्न ११ नॉव्हेल करोना व्हायरस आजाराचा बाधीत रूग्ण कोणास म्हणावे ?

उत्तर –एखादी व्यक्ती नॉव्हेल करोना बाधीत देशाला भेट देऊन आलेला असुन त्यास १४ दिवसांच्या आत सर्दी, ताप, खोकला, आढळुन आलेला असुन त्याच्या **Throat Swab** चा तपासणीचा अहवाल नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ व्हायरालॉजी पुणे येथुन दुषीत आढळुन आलेला असल्यास त्याला नॉव्हेल करोना व्हायरस आजाराचा बाधीत रूग्ण असे म्हणतात.

प्रश्न १२ सर्व सामान्य व्यक्तींनी कोणत्याही प्रकारचा मास्क वापरावा का ?

उत्तर –एन ९५ किंवा तीन घडीचा सर्जीकल मास्क डॉक्टर, नर्सेस, विलगीकरण कक्षात कार्यरत असलेले कर्मचारी, प्रयोगशाळेत काम करणाऱ्या व्यक्तींनी वापरण्याची गरज आहे. सर्व सामान्य व्यक्तींना वापरण्याची गरज आहे. सर्व सामान्य व्यक्तींनी स्वच्ध चारपदरी हातरूमाल वापरणे पुरेशे आहे. त्यांनी वरील प्रमाणे डिस्पोजेबल मास्क वापरण्याची गरज नाही. सामान्य जनतेचे डिस्पोजेबल मास्क वापरून ते इतरत्र फेकल्याने विषाणुंचा प्रासर होण्याची भिती असते.

प्रश्न १३ नॉव्हेल करोना व्हायरस आजाराचा बाधीत रूग्ण दवाखान्यात भरती होणे आवश्यक आहे का ?

उत्तर –नॉव्हेल करोना व्हायरस आजाराची बाधा झाली असेल तर रोगाचा प्रसार टाळण्याच्या दृष्टीने आणि सुयोग्य उपचारासाठी शासकीय रूग्णालयात भरती व्हावे.

प्रश्न १४ चीनमधील शिपींगच्या पॅकेजद्वारे करोना विषाणुचा धोका आहे का ?

उत्तर –नव्याने उदयास आलेल्या करोना विषाणुचा आणि ते कसे पसरते याबद्दल अद्याप बरेच काही माहिती नाही. यापुर्वी दोन इतर करोना विषाणु लोकांमध्ये गंभीर आजार निर्माण करण्यासाठी उदभवेल आहेत. **(MERS And SARS). nCov2019** नॉव्हेल करोनासाठी करणीभुत होणारा विषाणु आनुवंशिकरित्या **MERS And SARS** संबधित आहे. परंतु दोघांची उत्पत्ती वटवाघुळापासून झालेली आहे. हा विषाणू **MERS And SARS** प्रमाणेच वर्तन करेल याची आम्हाला खात्री नसली तरीही आपण यापुर्वीच्या दोन्ही करोना विषाणु कडून मिळवलेल्या माहितीचे मागदर्शन करण्यासाठी वापरू शकतो. सर्वसाधारणपणे, पृष्ठभागावर या करोना विषाणुचे कमी अस्तित्व टिकून राहिल्यामुळे, भोवतालच्या तापमानात काही दिवस किंवा आठवड्यांत पाठविल्या जाणाऱ्या उत्पादनांचा किंवा पॅकेजींगचा प्रसार होण्याची शक्यताा फारच कमी असते. करोना विषाणु सहसा श्वसन थेंबांद्वारे **(Droplet)** पसरतात असे मानले जाते. सध्या आयात वस्तुंशी संबधित नोव्हेल करोनाच्या संप्रेषणास पाठिंबा देण्याचा कोणताही पुरावा नाही आणि आयात केलेल्या वस्तुंशी संबंधित कोणतीही घटना घडली नाही.

प्रश्न १५ चीनमधून आयात केलेले प्राणी किंवा प्राणी उत्पादनांचे काय ?

उत्तर –चीनमधून आयात केलेले प्राणी किंवा प्राणीजन्य पदार्थ यांचेकडून करोना विषाणू पसरविण्याचा धोका आहे. असे कोणतेही पुरावे सेंटर फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेंशन यांचेकडे नाही. ही वेगाने विकसनशील परिस्थिती आहे. आणि माहिती उपलब्ध होताना ती अद्यावत केली जाईल.

**मा.मुरलीधर मोहोळ**
महापौर
पुणे महानगरपालिका

**मा.शेखर गायकवाड**
आयुक्त
पुणे महानगरपालिका